# महाराष्ट्र विधानसभा
# दिवसाच्या कामकाजाचा क्रम

**बुधवार, दिनांक १८ डिसेंबर, २०१९**

**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** :

(क) श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांचे सन २०१३-२०१४ ते २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) वने व संसदीय कार्य मंत्री** :

(क) महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल आणि हिशेब सभागृहासमोर ठेवतील.

: (ख) विधानसभेच्या सन २०१९ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक १७ जून, २०१९ ते दिनांक २ जुलै, २०१९ या कालावधीत मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ९१ आश्वासनांची यादी, तसेच सन २०१९ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण ३०५ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह, सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**तीन : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (शेवटचा दिवस).**

**(मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर, २०१९ रोजीच्या दिवसाच्या कामकामाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**चार सर्वश्री सुनिल प्रभू, अजित पवार, विजय वडेट्टीवार, संजय राठोड, दिलीप वळसे-पाटील, अशोक चव्हाण, ॲड आशिष जयस्वाल, सर्वश्री धनंजय मुंडे, पृथ्वीराज चव्हाण, डॉ. संजय रायमुलकर, श्री बाळासाहेब पाटील, ॲड. के.सी. पाडवी, सर्वश्री बच्चू कडू, नवाब मलिक, सुनिल केदार, नितीन देशमुख-टाले, दिलीप बनकर, रणजित कांबळे, राजकुमार पटेल, रोहित पवार, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री संजय गायकवाड, दिपक चव्हाण, राजेश टोपे, अमित झनक, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री अनिल देशमुख, सुभाष धोटे, जितेंद्र आव्हाड, बबनराव शिंदे, कुणाल पाटील, हसन मुश्रीफ, अस्लम शेख, अमिन पटेल, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"विदर्भातील मिहान येथे दीड लाख नोकऱ्या देण्याची योजना असतांना गेल्या पाच वर्षात नोकऱ्या व रोजगारांचे प्रमाण अत्यल्प असणे, विदर्भाच्या महत्वाकांक्षी मिहान प्रकल्पाला चालना देण्यासाठी सर्वोतोपरी गरज, विदर्भातील विदयापीठांमधून दरवर्षी लाखो पदवीधर निर्माण होणे, बेरोजगार युवकांची वाढती संख्या लक्षात घेता मिहानमध्ये रोजगार वाढीसाठी जड उदयोग, कृषी प्रक्रिया उदयोग, ऑटोमोबाईल प्रकल्प सुरु करण्याची आवश्यकता असणे, विदर्भातील विदयापीठांनी रोजगाराभिमुख अभ्यासक्रम तयार करुन त्याव्दारे रोजगार निर्मिती करण्याची आवश्यकता असणे, जलयुक्त शिवार योजनेमुळे मोजक्याच शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पोचलेले असणे, विदर्भातील सिंचनाचा अनुशेष मोठया प्रमाणात असल्याने तो भरुन काढण्याची गरज असणे, विदर्भातील प्रलंबित १३४ सिंचन प्रकल्पांना चालना देण्याची गरज असणे, त्याकरिता राज्य सरकारने विदर्भातील सिंचन प्रकल्पांना अधिकाधिक निधी देऊन निश्चित कालमर्यादेत सिंचन प्रकल्प पूर्ण करणे आवश्यक असणे, जल नियामक प्राधिकरणाने आगामी पाच वर्षात सिंचन अनुशेष दूर करण्यासाठी माननीय राज्यपालांना सादर केलेल्या पाच वर्षीय योजनेला गांभीर्यपूर्वक पूर्ण करण्याचे निश्चित धोरण आखण्याची गरज असणे, गोसेखुर्द राष्ट्रीय प्रकल्प सन २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे फेरनिर्धारित करण्याच्या धोरणाचा तातडीने फेरआढावा घेण्याची गरज असणे, गोसेखुर्द प्रकल्प २४ महिन्यात पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारकडून निश्चित धोरण आखण्याची व निधी पुरवठा करण्याची तातडीची गरज असणे, विदर्भातील कापूस, सोयाबीन, तूर, धान, मका इत्यादी उत्पादनावर आधारित कृषी प्रक्रिया प्रकल्प भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, बुलडाणा व अकोला या जिल्हयांमध्ये निर्माण करणे, संत्रा प्रक्रिया प्रकल्पाला नवीन चालना देण्याची गरज असणे, विदर्भातील औष्णिक वीज प्रकल्पांच्या अत्याधुनिकीकरणासाठी राज्य सरकारने तातडीने पावले उचलण्याची गरज असणे, या प्रकल्पांना नियमित कोळसा पुरवठा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे, विदर्भासह राज्यातील पर्यावरणाला धोका निर्माण झाला असून मागील सरकारने घोषित ३३

कोटी वृक्षलागवड योजनेत मोठा गैरप्रकार झाला असणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय आणि अनुसंधान संस्थानला सन २०१४ मध्ये मंजूरी मिळणे, तथापि, अद्यापही रुग्णालयाचे काम अदयाप सुरु न होणे, अमरावतीत वस्त्रोदयोग पार्कला शासनाकडून प्रोत्साहन मिळण्याची तेथील उत्पादकांची अपेक्षा असणे, विदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विदयापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विदयापीठ, गोंडवाना विदयापीठ तसेच कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विदयापीठ तसेच महाविदयालयामध्ये मोठया प्रमाणात रिक्त जागा असणे, त्यामुळे उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होणे व त्याचा परिणाम विदर्भातील रोजगार निर्मितीवर होणे, नागपूरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयातले अपग्रेडेशनचे काम रखडणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विस्तारीकरणाचे काम जमिनी अभावी रखडणे, मागील ५ वर्षात विदर्भासाठी मोठमोठया घोषणा करण्यात येणे परंतु त्या पुर्ण न होणे, विदर्भात वन्यजीव पर्यटन विकासाकरिता उपलब्ध असणारी विपूल साधनसंपत्ती व संधी यांचा उपयोग करुन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संसाधनासहीत विकास करणे, पर्यटकांना आकर्षित करुन अनेक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा, राज्याच्या आर्थिक क्षमतेत वाढ व्हावी व पर्यटन तसेच सेवा उदयोग वाढावा, राष्ट्रीय वन्यजीव पर्यटन स्थळाप्रमाणे वन्यजीव सर्किट तयार करुन ताडोबा, पेंच, नागझिरा इ.वन पर्यटन स्थळे विकसित करणे, विदर्भातील तिर्थक्षेत्रे व पर्यटन स्थळांचे सर्किट तयार करुन रोजगार निर्मिती वाढविणे, विदर्भातील रस्ते विकासाचा अनुशेष लक्षात घेता राज्य महामार्गाचे चौपदरीकरण करण्याची आवश्यकता असणे, नागपूर येथील इंदिरा गांधी वैदयकिय महाविदयालय व इस्पितळाला आंतरराष्ट्रीय स्वरुपाचा दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता असणे, विदर्भातील शेतकऱ्यांसाठी महत्वपूर्ण असलेल्या दुग्धव्यवसाय वाढीसाठी एन.डी.डी.बी च्या सहकार्याने मराठवाडा व विदर्भात पशुसंवर्धन व दुग्धव्यवसायाच्या कार्यक्रमाला चालना देऊन शेतकऱ्यांना स्थायी उत्पन्न निर्माण करण्याची आवश्यकता असणे, मिहान मध्ये योगगुरु रामदेव बाबांच्या पतंजली फुडपार्क बंद झाल्याने तेथील कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळणे परिणामी हजारो कर्मचाऱ्यांच्या परिवारावर उपासमारीची वेळ येणे, विदर्भातील रस्त्यांची कामे अपूर्णावस्थेत राहिल्यामुळे होणारे रस्ते अपघात, मेळघाट व्याघ्रप्रकल्पातील गावांचे तसेच पेढी प्रकल्पाच्या पुनर्वसनाचे काम गेल्या ५ वर्षापासून रखडणे, विदर्भातील कापूस उत्पादनावर आधारित सुतगिरण्या व कापूस उदयोगाला चालना देण्याची गरज असणे, विदर्भाच्या विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेऊन उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता व करावयाची उपाययोजना."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १७ डिसेंबर, २०१९

**राजेन्द्र भागवत,**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा